सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.**

९३, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५

ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/४७७/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - १७/१०/२०२६

# अधिसूचना

पुसेगाव पोलीस ठाणे हद्दीत मौजे पुसेगाव ता. खटाव येथे दि. २०/१०/२०२६ रोजी विजया दशमी दसरा निमित्ताने दुर्गादेवीची मिरवणूका निघत असून सदर मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी सातारा जिल्ह्यातून सुमारे २५००० ते ३०००० भाविक येत असतात. त्यामुळे सातारा ते पंढरपुर मार्गावर पुसेगाव शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होवून वाहतूक धिम्या गतीने चालू असते. सध्या सर्व ठिकाणचे साखर कारखाने सुरु झाले असुन ऊसाच्या ट्राली, मोठे ट्रक, अवजड वाहने व दुर्गा देवीची मिरवणूक, भाविकांची गर्दी यामुळे रस्ता वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता असलेने सदर मिरवणुकीत वाहतूक सुरळीत राहणेकामी व भाविकांची / नागरीकांची व वाहन चालकांची गैरसोय होवू नये याकरीता वाहतुकीचे नियोजन होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सदर मार्गावरील वाहतूक ही पर्यायी मार्गाने वळविणे बाबतची अधिसूचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी निखील पिंगळे भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये पुसेगाव शहरामधून जाणाऱ्या सातारा ते पंढरपुर या राज्य महामार्गावरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतूक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दिनांक २०/१०/२०२६ रोजी १७.०० ते २३.५९ वा. पर्यतची खालील अधिसूचना पारित करीत आहे.

**वाहतूक मार्गातील बदलाबाबत**

**वाहतूक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.**

१. सातारा बाजू कडून दहिवडी बाजूकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक पुसेगाव गावात न जाता नेर फाटा - नेर गाव - ललगुण - बुध - राजापूर - कुळकजाई - मलवडी मार्गे दहिवडी कडे जाईल.

२. दहिवडी बाजू कडून सातारा बाजूकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक ही कटगुण - खातगुण फाटा - खातगुण गाव - जाखणगाव - विसापुर - विसापुर फाटा (औंध फाटा) येथून सातारा कडे जाईल. **किंवा** पिंगळी येथून वडुज - चौकीचा आंबा - विसापुर - विसापुर फाटा (औंध फाटा) येथून सातारा कडे जाईल.

३. वडुज बाजू कडून फलटण बाजूकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक पुसेगाव गावात न येता खटाव येथून जाखणगाव - विसापुर - विसापुर फाटा (औंध फाटा) - नेर फाटा - नेर गाव - ललगुण - बुध मार्गे फलटण कडे जाईल.

४. फलटण वरुन वडुज बाजूकड जाणारी सर्व प्रकारची वाहतूक पुसेगाव बाजूकडे न येता ललगुण येथून नेर गाव - नेर फाटा - विसापुर फाटा - विसापुर - जाखणगाव - खटावमार्गे वडुजकडे जाईल.

५. पुसेगाव मधील दुर्गादेवी मिरवणुकीचा मार्ग दिनांक २०/१०/२०२६ रोजी १७.०० ते २३.५९ वा.पर्यंत वाहतुकीसाठी बंद करणेत येत आहे.

Scanned with CamScanner

तरी वरील वाहतुक ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतुक मार्गात केलेल्या बदलांसाठी सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसूचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक १७/१०/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(निखील पिंगळे) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - १७/१०/२०२६

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.
२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.
३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी
४) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, सोलापूर ग्रामीण, सांगली, कोल्हापूर.
२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.
५) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.
६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

१) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.
२) मा.जिल्हाधिकारी सातारा.
३) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.
४) विभागीय नियंत्रक,म.रा.मार्ग परि.महामंडळ,सातारा विभाग,सातारा

Scanned with CamScanner